| Publication : Maharashtra Times | Edition : Mumbai |
|---|---|
| Date : March 20, 2020 | Page: 5 |

# डिजिटल व्यवहार शुल्क माफ

मुंबई : करोना विषाणूमुळे निर्माण झालेली गोंधळाची परिस्थिती विचारात घेता, बँक ऑफ बडोदाने पुढील तीन महिन्यांसाठी डिजिटल व्यवहारांसाठी आकारण्यात येणारे शुल्क माफ केले आहे. बँकेने प्रसिद्ध केलेल्या पत्रकात हे नमूद करण्यात आले आहे. करोनाच्या पार्श्वभूमीवर बँक ऑफ बडोदाने 'राहा सुरक्षित बँकिंग करा सुरक्षित' ही मोहीम राबवण्यास सुरुवात केली आहे. यामध्ये अधिकाधिक ग्राहकांना बँक शाखेत येऊन प्रत्यक्ष व्यवहार करण्यापेक्षा डिजिटल व्यवहार करण्यास प्रोत्साहन दिले जात आहे.